दि. 31जानेवारी,2014

# कॉंग्रेस मध्ये घबराट

अरुण जेटली
विरोधी पक्षनेते(राज्यसभा)

जस-जशा निवडणुका जवळ येत आहेत, कॉंग्रेस पक्षात घबराट वाढत आहे. प्रत्येक जण जोशपूर्ण मुकाबला करण्याची तयारी करण्याऐवजी आपल्या स्थितीकडे पाहून अचंबित झाला आहे.

अमेठी कॉंग्रेस पक्षाचा बालेकिल्ला आहे. हे राहुल गांधी यांचे निर्वाचित क्षेत्र आहे. याचे चार दशकांपासून एका परिवाराने पालन-पोषण केले आहे. अमेठी चे राजा संजय सिंह हे राहुल गांधी यांच्या विरोधात निवडणुक लढवू शकतात हा विचारच कॉंग्रेस पक्षाच्या पंतप्रधान पदाच्या वास्तविक उमेदवाराला घाबरवण्यासाठी पुरेसा होता. अमेठी च्या राजाला आसाम मधून राज्यसभेत पाठवावे लागले. अमेठी ला वाचवण्यासाठी एक प्रकारची सुरक्षा भिंत उभी करावी लागत आहे. त्याचबरोबर सपा आणि बसपा बरोबर सौदेबाजी केली जात आहे की, वर्तमान खासदाराच्या विरोधात अल्पसंख्यक समुदायाचा उमेदवार उतरु नये. या पूर्ण प्रक्रियेत कॉंग्रेस पक्षाच्या नेत्याची फक्त व्यक्तिगत घबराट दिसून येत नाही तर आसाम मध्ये पक्षाच्या भावनांना पण ठेच पोचली आहे. पूर्वोत्तर आणि जम्मू-काश्मीर सारखे राज्य विशेष करुन संवेदनशील आहेत आणि त्यांना पाहिजे आहे की, त्यांचा स्वतःचा उमेदवार खासदार म्हणून निवडून यावा.

हरियाणा, हिमाचल प्रदेश आणि छत्तीसगड मधील वरिष्ठ नेते राज्यसभेत येण्याच्या तयारित आहेत ज्यांनी या निवडणुकीत निवडणुक प्रचाराची धुरा सांभाळली पाहिजे.

सहयोगींची परिस्थिती पण काही वेगळी नाही. तृणमूल कॉंग्रेस,डीएमके आणि टीआरएस त्या प्रमुख सहयोगींपैकी आहे ज्यांचा युपिएबरोबरचा संपर्क समाप्त झाला आहे. वर्तमान सहयोगींमध्ये राकापा आणि नॅशनल कॉन्फरंस प्रमुख सहयोगी आहे. राकापा दररोज परस्पर विरोधी संकेत देत आहे. त्यांच्या नेत्यांचे 2002 मधील गुजरात दंगलीसंदर्भातील विधान कॉंग्रेस पक्षाच्या रेषेच्या विपरित आहे. नॅशनल कॉन्फरंसला हा आभास झाला आहे की, नवी दिल्लीत सत्तारुढ पक्षासोबत युती काश्मीर खो-यासाठी तोट्याचा सौदा असेल. तो त्यांच्याशी नाते तोडण्याच्या तयारित आहे.

नुकतेच कॉंग्रेस पक्षाचा कोणताही राज्य विभाग, केंद्रीय नेतृत्त्वाला आव्हान देण्याचे धाडस करु शकले नाही. मुख्यमंत्र्यांच्या नेतृत्त्वाखाली आंध्रप्रदेशातील अधिकतर कॉंग्रेसींनी तेलंगाणासंदर्भात पक्षाच्या निर्णयाला मानले नाही. आता आंध्र प्रदेशात राज्यसभेच्या निवडणुकांसाठी क्रॉस वोटींग होऊ शकते. या सर्व घटनाक्रमांतून राज्यात कॉंग्रेसचे विभाजन होऊ शकते, जिथे 2004 आणि 2009 मध्ये पक्षाला सर्वात अधिक जागा मिळाल्या होत्या.

आणि शेवटी माझे मित्र केंद्रीय अर्थमंत्री श्री पी.चिदंबरम हे नॉर्थ ब्लॉक च्या इनिंग नंतर आता बाकी जीवनाची योजना बनवताना दिसत आहेत. ते एक सक्षम वकिल आहेत. खासदाराचे नुकसान सर्वोच्च न्यायालयासाठी फायदेमंद राहील. ज्याप्रकारे ते वक्तव्य करीत आहेत आणि आपल्या विरोधकांना ते बौद्धिक प्रश्न विचारत आहेत, मला संशय आहे की ते स्तंभ लेखनाचा अभ्यास करत असावेत. मला पूर्ण विश्वास आहे की, त्यांचा स्तंभ वाचणे मजेशीर ठरेल.